पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८
उदयान/वृक्षसंवर्धन विभाग
ई - निविदा नोटिस क्रमांक - ६ / २०१०-२०११

पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या उदयान विभागाकडील खालील कामासाठी ई टेंडर अंतर्गत नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. | कामाचे नांव | निविदा र.रु. | बयाणा र.रु. | अनामत र.रु. | कामाची मुदत | निविदा फॉर्म फि (परत न मिळणारी) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भंडारा डोंगर देहू येथे महापालिके मार्फत ४०००० वृक्षारोपण करणे व त्याची पाणी देणेसह देखभाल / संरक्षण दोन वर्षे करणे बाबत. | ९१,८२,०००० | ९१,८२० | ४,५९,१०० | २ वर्षे | १,०००/- |

सदर निविदेतील कामाचा तपशिल, अनामत, बयाणा, नियम, अटी, निविदा शेंडयुल इ. माहिती मनपाच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदरची निविदा मनपाच्या ई - टेंडरींग पध्दतीने मनपाच्या वेबसाईटवरुन भरावयाची आहे. या कामी मनपाच्या मा.अतिरिक्त आयुक्त कार्यालयात संबंधित ठेकेदारांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. सदरची ई - टेंडरींग प्रक्रीयेअंतर्गत निविदा दि.२३.०८.१० ते दि.०२.०९.२०१० दुपारी ३.०० वाजेपर्यंत ई - टेंडरींग पध्दतीने वेबसाईटवरुनच भरता येईल. जे निविदाधारक e - tendering प्रकीये अंतर्गत नोंदणी करतील त्यांनाच Digital Key देण्यात येणार आहे. त्यांनाच निविदा भरता येईल. निविदा धारकांनी निविदेची फॉर्म फि, बयाणा रक्कम मनपाच्या खात्यात पेमेंट गेटवे सिस्टीमव्दारे भरावयाची आहे. सदर निविदेचे फॉर्म विक्रीसाठी ठेवणेत येणार नाहीत. व फॉर्म स्विकृतीसाठी निविदा बॉक्स ठेवणेत येणार नाही. ठेकेदारांनी निविदा भरताना निविदा अटी/शर्तीमध्ये नमुद अनुभवविषयक व इतर आवश्यक कागदपत्रांच्या सत्यप्रती करून स्कॅन करून ॲटॅच फाईल व्दारे देण्यात यावे. सदर कामाबाबत कोणतीही माहिती आवश्यक असल्यास उद्यान विभागात श्री. गायकवाड पी.एम. उद्यान अधिक्षक (वृक्ष) (मो. नं. ९९२२५०१९२८) यांचेशी संपर्क साधावा.

कोणतेही कारण न देता निविदा पूर्णत: किंवा अंशत: मंजुर अथवा नामंजुर करणेचा अधिकार मा.आयुक्त यांनी स्वत: कडे राखून ठेवला आहे.

सदरची निविदा www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८

जाहिरात क्रमांक - १४०
क्रमांक - उदयान।५।कावि। ४७६।२०१०
दिनांक - १८।०८।२०१०

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८

उदयान/वृक्षसंवर्धन विभाग

ई निविदा नोटीस क्रमांक - ६ ।२०१०-२०११

**कामाचे नांव - भंडारा डोंगर देहू येथे महापालिके मार्फत ४०००० वृक्षारोपण करणे व त्याची पाणी देणेसह देखभाल / संरक्षण दोन वर्षे करणे बाबत.**

**अटी व नियम**

१) सदर निविदेतील कामाचा तपशिल, अनामत, बयाणा रक्कम, नियम, अटी, निविदा शेडयुल इ. माहिती मनपाच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदरची निविदा मनपाच्या ई-टेंडरींग पध्दतीने मनपाच्या वेबसाईटवरुन भरावयाची आहे. याकामी मनपाच्या मा.अति. आयुक्त कार्यालयात संबंधित ठेकेदाराची नोंदणी करणे आवश्यक आहे. सदरची ई-टेंडरींग प्रक्रीयेअंतर्गत निविदा दि. २३/०८/२०१० ते दि. ०२/०९/२०१० दुपारी ३.०० वाजेपर्यंत ई-टेंडरींग पध्दतीने वेबसाईटवरुनच भरता येईल. जे निविदाधारक e - tendering प्रकीये अंतर्गत नोंदणी करतील त्यांनाच Digital Key देण्यात येणार आहे. त्यांनाच निविदा भरता येईल. निविदा धारकांनी निविदेची फॉर्म फि, बयाणा रक्कम मनपाच्या खात्यात पेमेंट गेटवे सिस्टीमव्दारे भरावयाची आहे. सदर निविदेचे फॉर्म विक्रीसाठी ठेवणेत येणार नाहीत. व फॉर्म स्विकृतीसाठी निविदा बॉक्स ठेवणेत येणार नाही.

२) सदरचे वृक्षारोपण २ वर्षे कालावधी साठी आहे.

३) सदर कामासाठी २० एकर क्षेत्रावर शासकीय/निमशासकीय संस्थेकडील वृक्षारोपण/ उद्यान विषयक काम केलेचा अनुभव आवश्यक आहे. त्या प्रमाणे अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

४) निविदा सोबत खालील कागदपत्रांच्या सत्यप्रती स्कॅन करुन ॲटेच फाईलव्दारे देण्यात यावेत.
(१) ठेकेदार/ठेकेदारी संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र.
(२) अ.क्रं. ३ मध्ये नमुद केले प्रमाणे अनुभवाचे प्रमाणपत्र.
(३) आयकर भरत असल्या बाबत पुरावा/पॅनकार्ड ची झेरॉक्स प्रत.

५) कामाचा आदेश दिल्यानंतर ठेकेदाराने काम केले नाही तर त्याची अनामत रक्कम जप्त करणेत येईल.

६) ज्या ठेकेदारांस काम मिळेल त्यास परिशिष्ट अ प्रमाणे कामकाज पुर्ण केल्या नंतर केलेल्या कामापोटीचे होणा-या रक्कमेपैकी ७५ टक्के रक्कम अदाकरणेत येईल, उर्वरीत २५ टक्के वृक्षारोपण मनपाकडे हस्तांतरीत केल्या नंतर अदा करणेत येईल.

७) एकूण चालू वर्षात ४०,००० वृक्षारोपण करावयाचे आहे.

८) निम, वड, पिंपळ, उंबर, नांदुक, कॅशिया, सायमिया पेल्टाफोरम, कॅशियाजवानिका, कांचन, करंज, अशोक, सिलव्हर ओक, निलमोहर, चिंच, बोर, जांभुळ, आंबा, टबोबिया, शिसु, साम, बांबु, टबोबिया पेन्टाफिला इत्यादी प्रजातीची झाडे लागवड करणेत यावी.

९) वरील प्रजाती पैकी १५०० ते २००० वृक्ष प्रत्येक प्रजातीचे लावणेत यावीत तसेच मुख्य उद्यान अधिक्षक यांचे सुचने नुसार वृक्ष लागवड करावी.

१०) लावणेत आलेले रोप हे कमीतकमी २ ते ३ फूट उंचीची असावीत.

११) वर्षातून तीनवेळा रासायनिक खतांचा डोस देणेत यावे.

१२) वर्षातून एकदा अनावश्यक झाडांच्या फूटव्याची छाटणी करणे. तसेच वर्षातून एकदा झाडांना काडयांचा आधार देणे. (परिशिष्ट ड प्रमाणे) देखभालीचे संपूर्ण कामकाज करणे यावे.

१३) झाडांना सोबतच्या परिशिष्ट क नुसार आवश्यकते प्रमाणे पाणी देणे आवश्यक आहे.

१४) पहिल्या वर्षी ४०,००० वृक्षारोपण पावसाच्या पहिल्या आठवठयात लावून आळे करणे अत्यंत महत्वाचे आहे, या मध्ये जी रोपे दगावतील ती त्यावर्षीच लागवड करणे तसेच दुस-या वर्षी रोपे दगावली तर त्याची मरआळी त्याच वर्षी भरणेत येऊन मरअळी केलेली रोपे कमीत कमी ५ फूट उंचीचे असणे बंधनकारक आहे.

१५) प्रत्येक वर्षी वृक्षांची गणना प्रजातीनुसार म.न.पा. प्रतिनिधी समवेत करणेत येईल. तसेच याबाबत त्रुटी आढळून आलेस त्याची पूर्तता त्वरीत करुन घेणेत येईल.

१६) वृक्ष लागवड दिनांक पासून दोन वर्षाने जिवंत वृक्षांची गणना करतेवेळी ८० टक्के पेक्षा कमी वृक्षांची गणना आलेस आपल्या देय रककमेतील प्रति वृक्ष र.रु. २००/- प्रमाणे वजावट करणेत येईल.

१७) ज्या ठेकेदारास अथवा ठेकेदारी संस्थेस काम मिळेल व त्याची निविदा स्विकृत झालेनंतर करारनामा करणेपुर्वी असा ठेकेदार किंवा ठेकेदारीसंस्था मनपाचे विद्यमान नगरसेवक । स्विकृत सदस्य यांचेशी संबधित नाही याची खातरजमा करून तशा आशयाचे प्रतिज्ञापत्र रक्कम रूपये १००।- चे स्टँम्प पेपरवर नोटराईज्ड करून द्यावे लागेल.

१८) ज्या संस्थेस काम देण्यात येईल त्या संस्थेस एकूण निविदा रक्कमेच्या ५ टक्के अनामत म्हणून मनपा कडे ठेवावी लागेल.

१९) ज्या संस्थेस काम मिळेल त्याची निविदा स्विकृत झालेनंतर त्यास अनामत रक्कमेच्या ३ टक्के अधिक रक्कम रूपये १००।- च्या स्टँम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.

२०) आदेशात दिलेल्या मुदतीत जर काम करुन न दिलेस मुदत संपले नंतर प्रतिदिनी र.रु. १,०००/- फक्त विलंब आकार आकारुन तो बिलामधुन वसुल करणेत येईल.

२१) प्रस्तुत कामी कॉन्ट्रक्टर लेबर ॲक्ट १९७० चे कलम १२ नुसार कामगार आयुक्त पुणे यांचे मार्फत देण्त येणारा परवाना काम सुरु करणेपुर्वी संबधीत ठेकेदाराने घेणे बंधनकारक आहे. तसेच संबधित ठेकेदाराने त्याचे कर्मचा-यास प्रचलीत किमान वेतन कायद्यातील तरतुदी प्रमाणे वेतन दिले पाहिजे.

२२) सदरची निविदा स्विकृतीचे अंतिम दिनांकाचे दिवशी दुपारी ३.३० वाजता किंवा निविदा कमिटी ठरवील त्या दिवशी व वेळेस निविदा उघडण्यात येतील त्याबाबतची सुचना मनपा वेबसाईटवर देणेत येईल. निविदा उघडण्याच्या वेळी निविदाकार स्वतः अथवा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

२३) निविदा दर १२० दिवस कालावधीसाठी ग्राहय राहील.

२४) अटियुक्त निविदा स्विकरणेत येणार नाहीत तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही अथवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क मा. आयुक्त यांनी राखुन ठेवला आहे.

२५) सदरची जाहिरात मनपाची www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८

ठेकेदाराचे नाव व स्वाक्षरी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८

उदयान/वृक्षसंवर्धन विभाग

ई निविदा नोटीस क्रमांक - ६ /२०१०-२०११

## निविदा फॉर्म

ठेकेदाराने सादर करावयाचे दरपत्रक

**प्रपत्र अ**

| अ. | कामाचा तपशिल | अंदाजपत्रकीय रक्कम | (सर्व करासह) परसेंटेज मध्ये दर द्यावेत. |
|---|---|---|---|
| १ | भंडारा डोंगर देहू येथे महापालिके मार्फत ४०००० वृक्षारोपण करणे व त्याची पाणी देणेसह देखभाल/ संरक्षण दोन वर्षे करणे बाबत. | रु. ९१,८२,०००/- | अंदाजपत्रकीय रक्कमे पेक्षा ------- टक्के कमी/जास्त. |

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

ठेकेदाराचे नाव -

सही व शिक्का -

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८

## वृक्षसवंर्धन विभाग

भंडारा डोंगर देहू येथे ४०००० वृक्षारोपण करणे व त्याचे दोनवर्षे देखभाल व संरक्षण करणेकामी खर्चाचे अंदाजपत्रक

### खर्चाचे अंदाजपत्रक

### परिशिष्ट अ

| अ. | कामाचा तपशिल | परिणाम | दर प्रति | एकुण खर्च र.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | खडडे खोदणे व त्यामध्ये पोयटा माती भरणे (०.६०X०.६०X०.६०m) | ४०००० नग | ६५.८३ प्रतिनग | २६३३२०० |
| २ | वृक्षारोपणाची रोपे | ४४००० नग | ५.०० प्रतिनग | २२०००० |
| ३ | वृक्षारोपणाची रोपे वहातुक करुन खडडयामध्ये लागवड करणे. | ४४००० नग | ३.०० प्रतिनग | १३२००० |
| ४ | वृक्षारोपणाचे दोन वर्षे कालावधी पर्यंत देखभाल व संरक्षण करणे. | ४०००० नग | २१.३९ प्रतिवृक्ष प्रतिवर्षे | १७११२०० |
| ५ | वृक्षारोपणास टँकरने पाणीपुरवठा करणे दोन वर्षे प्रतिवर्षातुन ७ महिने (नोव्हे. ते मे ) | ८४०० ट्रिपा | ५३४-/ प्रति ट्रिप | ४४८५६०० |
| | **एकूण खर्च र.रु.** | | | **९१८२०००.००** |
| | | | | |
| | (एकुण खर्च र.रु. ९१,८२,०००/-) | | | |
| | पूर्णांकित र.रु. ९२,००,०००/- | | सही/- | |
| | | | मुख्य उद्यान अधिक्षक | |
| | | | पिंपरी चिंचवड महानगरपालिका | |
| | | | पिंपरी-१८ | |